**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 24.11.2025** **वार- सोमवार**

---

**<u>सवाईगंधर्व</u>**

आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीनं दरवर्षी आयोजित करण्यात येणारा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव यंदाच्या वर्षी बुधवार दिनांक १० डिसेंबर ते रविवार १४ डिसेंबर दरम्यान मुकुंदनगर इथल्या महाराष्ट्रीय मंडळ क्रीडासंकुल इथं संपन्न होणार असून महोत्सवात यावर्षी सादरीकरण करणाऱ्या कलाकारांच्या नावांची घोषणा आज झालेल्या पत्रकार परिषदेत आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी केली. यंदा महोत्सवाचे ७१ वे वर्ष असून यावर्षी निम्म्याहून अधिक कलाकार प्रथमच आपली कला या व्यासपीठावर सादर करतील, अशी माहिती जोशी यांनी दिली.

यावर्षीच्या महोत्सवात पंडित उल्हास कशाळकर, विदुषी पद्मा देशपांडे, विदुषी डॉक्टर अश्विनी भिडे देशपांडे, कला रामनाथ आणि डॉक्टर जयंती कुमरेश तसंच पंडित व्यंकटेश कुमार हे जेष्ठ दिग्गज कलाकार आपली कला सादर करणार आहेत. तसंच डॉक्टर भरत बलवल्ली,

सावनी शेंडे यांच्यासारखे आघाडीचे गायक आणि नव्या दमाचे अनेक कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

जॅझ आणि भारतीय शास्त्रीय संगीत यांचा अभूतपूर्व संगम साधणारं, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सॅक्सोफोनवादक जॉर्ज ब्रूक्स आणि सतार वादक पंडित कृष्णमोहन भट यांचं सहवादन हे यंदाच्या महोत्सवाचं आकर्षण असेल.

**<u>ऊसगाळपकारखान्यांचीसंख्या</u>**

राज्यात ऊस गाळप करणाऱ्या कारखान्यांची संख्या यंदा, गतवर्षीपेक्षा वाढण्याची शक्यता आहे. आत्तापर्यंत १९३ कारखान्यांना साखर आयुक्तालयानं परवाने दिले आहेत तर २१ कारखान्यांचे प्रस्ताव विविध पातळ्यांवर प्रलंबित आहेत, गतवर्षीच्या रास्त आणि किफायतशीर दर, म्हणजे एफआरपी न दिलेल्या ३८ कारखान्यांना राज्य सरकारच्या सूचनेनुसार, गाळप हंगामासाठी परवानगी देण्यात आली आहे. राज्यात १ नोव्हेंबरपासून ऊस गाळप हंगामाला सुरुवात झाली आहे. १९३ पैकी आत्तापर्यंत १४७ कारखान्यांनी गाळप हंगाम घेण्यास सुरुवात केली असून सोलापूर विभागातील ३२ सर्वाधिक कारखान्यांनी ऊस गाळप सुरू केलं आहे. २०२४-२५ मध्ये २०० कारखान्यांनी गाळप घेतलं होतं.

**<u>रक्तदानशिबिर</u>**

पुणे शहरात रक्ताचा तुटवडा गंभीर होत असताना, पुणेकरांनी पुन्हा एकदा सामाजिक उत्तरदायित्वाच्या परंपरेचं जतन करीत, ५६ रक्तदान शिबिरांमधून १० हजार ३३८ रक्तपिशव्यांचं विक्रमी संकलन केलं.

खासदार आणि केंद्रीय सहकार तसंच नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त हे रक्तदान महाअभियान आयोजित करण्यात आलं होतं. या उपक्रमाला पुणेकरांनी दिलेल्या अभूतपूर्व प्रतिसादाबद्दल मोहोळ यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

**महारेरानवीकार्यप्रणाली**

घर खरेदीदारांना नुकसानभरपाई मिळण्यात विलंब होऊ नये, यासाठी महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरणानं म्हणजे महारेरानं नवी कार्यप्रणाली जाहीर केली आहे. यात बांधकाम व्यावसायिकांनी नुकसानभरपाई, ६० दिवसांत देणं बंधनकारक केलं आहे. पहिल्यांदा संधी देऊनही नुकसान भरपाई दिली नसल्यास, विकासकाची प्रकरणं, संबंधित नागरी दंडाधिकाऱ्याकडं पाठवली जातील. यामुळं विकासकाला, तीन महिन्यांचा कारावास होऊ शकतो. या कार्यप्रणालीमुळे घर खरेदीदारांना लवकर नुकसान भरपाई मिळू शकेल.

**स्वीपउपक्रम**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगानं शहरातील मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज सुमारे ३८ हजार ३४० जणांनी मतदान करण्याची विक्रमी शपथ घेतली.

ही शपथ मोशी इथल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ स्मारकाला मानवंदना देण्यासाठी, पिंपरी चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, डब्ल्यूटीई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं, 'रिव्हर सायक्लोथॉन २०२५' स्पर्धेच्या आयोजना दरम्यान घेण्यात आली.

**उपक्रम**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागानं ‘टाकाऊ वस्तूंपासून सर्जनशीलता’ या संकल्पनेला नवचैतन्य देत, शहरातील टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक कलाकृती निर्मितीचा उपक्रम मोठ्या उत्साहात राबवला आहे. शहरातील विविध ठिकाणी, हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला आहे. यामध्ये प्रभाग १७ बिजलीनगर, प्रभाग २२ शांती चौक काळेवाडी, प्रभाग ५ सखुबाई गवळी उद्यान, आळंदी रोड, आणि भोसरी इथं असलेली संवेदनशील ठिकाणं आता रंगतदार, देखण्या कलाकृतींनी सुशोभित झाली आहेत.

महापालिकेच्या सफाई सेवकांनी केवळ स्वच्छता न करता, टाकाऊ टायर, प्लास्टिकचे डबे, बाटल्या, लोखंडी चौकटी, पाईप यांसारख्या वस्तूंचा कल्पकतेनं उपयोग करून, उद्यानं, रस्त्याकडील जागा आणि सार्वजनिक ठिकाणांचं सुशोभीकरण केलं.

**हवामान**

पुण्यात थंडी ओसरली असून तापमानात वाढ झाली आहे. आज किमान तापमान 17 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**